नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १३/०६/२०२५ (शुक्रवार)**

---

## उमरेड ते भिवापुर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३५३(डी) वरील अपघात प्रवण स्थळाचे कामास सुरूवात

नागपुर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत उमरेड ते भिवापुर हद्दीतुन जाणारा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३५३ (डी) या महामार्गावर अरूंद रोड, सुरक्षा कठडे नसलेले पुल, वाढलेली मोठी झाडे, रोडवरील खड्डे, अपघात प्रवण स्थळ दर्शक फलक चा अभाव आणि अतिक्रमण या कारणांमुळे पोलीस स्टेशन भिवापुर हद्दीत प्राणांकीत व किरकोळ अपघाताचे प्रमाण वाढले होते. सदर महामार्गावरील अपघातास प्रतिबंध करण्यासाठी कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग, नागपुर यांना नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीस विभागाकडुन पत्रव्यवहार करण्यात आले होते. त्यानंतर मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी दिनांक १०/०६/२०२५ रोजी श्रीमती वृष्टी जैन, सहा.पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, उमरेड, श्री वैभव जाधव, पोलीस निरीक्षक ,जिल्हा वाहतुक शाखा, नागपुर ग्रामीण , श्री जगताप ,कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग, नागपुर आणि श्रीमती वैष्णवी कायलकर, सेव्ह लाईफ फाऊंडेशन यांची पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपुर ग्रामीण जिल्हा येथे संयुक्त बैठक घेतली. सदर बैठकीत राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३५३(डी) यावर होणाऱ्या अपघाताच्या कारणांवर व त्याचेवर प्रतिबंधात्मक उपाययोजनांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. मा. पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग, नागपुर यांना सविस्तर मार्गदर्शन केले.

**राष्ट्रीय महामार्ग विभाग, नागपुर यांनी बैठकीनंतर तात्काळ ४८ तासाच्या आत उमरेड ते भिवापुर हद्दीतुन जाणारा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३५३ (डी) यावर काम सुरू केले. महामार्गावरील वाहतुकीस अडथळा निर्माण करून अपघातास कारणीभुत असलेली महामार्गालगतची वाढलेल्या झाडांच्या फांदयांची कटाई सुरू केली. लवकरच नमुद महामार्गावर**

अपघातास प्रतिबंध करण्यासाठी सर्वोतोपरी उपाययोजना करणार असल्याबाबत माहीती श्री जगताप, कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग, नागपुर यांनी दिली आहे.





## पोलीस स्टेशन कुही हद्दीत सट्टापट्टी लिहणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद
## कुही पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कुही** :— दिनांक १२/०६/२०२५ रोजी कुही पोलीसांना गुप्तबातमीदारा मार्फत माहिति मिळाली की, मुकेश बाबूराव बावीसकर, रा. कुही, ता. कुही, जि. नागपुर हा आपल्या आर्थिक फायदया साठी स्वताच्या घरामध्ये स्वत:च्या मोबाईल वर  सटाप्पटीचे आकडे घेवुन सट्टापट्टी चालवित आहे. .मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी नमुद घटनास्थळी जावुन धाड टाकुन  टाकली असता मुकेश बाबूराव बावीसकर,वय ४० वर्षे, रा. कुही, ता. कुही, जि. नागपुर हा आपल्या आर्थिक फायदया साठी  स्वत:च्या घरामध्ये मोबाईल वर  सटाप्पटीचे आकडे

लिहतांना मिळुन आला. पोलीसांनी पंचासमक्ष आरोपीच्या ताब्यातुन  रोख रक्कम ४१०/— रुपये आणि एक ओपो कंपनीचा ॲंड्रॉईड मोबाईल किंमती १३,०००/— रुपये असा एकुण १३,४१०/—रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.

नमुद **आरोपीविरूद्ध कलम १२** (अ) **महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

**मा. पोलीस अधिक्षक**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**
**यांच्या मान्यतेने**